नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/07/2023 (सोमवार) दुपार

---

## बुट्टीबोरी येथे तेल सदृष मुद्देमालाची वाहतुक करणाऱ्यांवर (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

दि. १६/०७/२०२३ ते दिनांक १७/०७/२०२३ दरम्यान कोबिंग ऑपरेशन दरम्यान पोलीस ठाणे बुट्टीबोरी हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर खबर दिली कि, ०१ इसम टाटा इंडिका वाहन क्रं MH ३१/CP ५८२२ ने स्वत: जवळ चोरीचा मुद्देमाल तेल सदृष मुद्देमालाची वाहतूक करीत आहे. अशा प्राप्त खबरेची शहानिशा करणेकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नमुद घटनास्थळी नाकाबंदी सुरु केली असता **आरोपी नामे– असिफ अब्दुल्वाफा सिद्दीकी, वय २७ वर्ष, रा. कलमना नागपुर** यांचे वाहन नाकाबंदी दरम्यान तपासण्यात आले असता त्याचे जवळ २४० लिटर तेल सदृष् मुद्देमाल मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन १) २४० लिटर तेल सदृष मुद्देमाल किंमती अंदाजे २४,०००/– रू. २) टाटा इंडिका वाहन क्रं MH ३१ CP ५८२२ किंमती अंदाजे १,००,०००/– रू. असा एकुण १,२४,०००/– रूपयाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे बुट्टीबोरी येथे कलम ४१ (१) (ड) जा.फौ. सहकलम १३०/१७७, ३(१)/१८१ मोवाका. अन्वये इस्तगासा दाखल करण्यात आला असून संबंधित कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आंनद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशीष मोरखडे, पोलीस हवालदार मिलिंद नांदुरकर, मयूर ढेकळे, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे तालेवार, पोलीस शिपाई राकेश तालेवार, चालक पोलीस शिपाई सुमित बांगडे यांनी पार पाडली.

## घरफोडी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा ब्राम्हणी वैशाली नगर वार्ड क्र ०३ येथे दिनांक १५/०७/२०२३ चे १६.०० वा. दिनांक १६/०७/२०२३ चे ०६.४९ वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. स्मिता प्रफुल बागडे, वय ३२ वर्ष रा. ब्राम्हणी वैशाली नगर वार्ड क्र. ०३ ही आपले घराला कुलुप लावुन आईचे घरी गेली होती. फिर्यादीचे घराचे शेजारी राहणारे यांनी फिर्यादीला फोन करून सांगितले की, तुमचे घराचे दार उघडे आहे व कुलुप तुटलेले आहे. असे सांगितले वरून फिर्यादीने घरी येवुन पाहिले असता लोखंडी अलमारीचे लॉकर मध्ये ठेवलेली छोटी पर्स ज्यामध्ये (१) एक सोन्याची चैन साडे पाच ग्रॅम किंमती अंदाजे २२०००/– रू २) सोन्याची अंगठी पाच ग्रॅम किंमती अंदाजे १७०००/–रू (३) चांदीची पायपट्टी किंमती अंदाजे १०००/–रू ४) नगदी २५०००/–रू आणि देव घरात ठेवलेले गुल्लक मध्ये किंमती अंदाजे २०००/–रू असे एकुण ६७,०००/– रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने बंद घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक दिलीप पोटभरे मो. नं. ९९२३००२६६४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील गजानन नगर कांद्री कन्हान येथे दिनांक १५/०७/२०२३ चे १६.०० वा. ते दिनांक १६/०७/२०२३ चे १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– अमोल लक्ष्मण वानखेडे, वय ३८ वर्ष, रा. प्लॉट नं १६ गजानन नगर कांद्री कन्हान हे आपले परिवारासह बाहेरगावी गेले होते त्या दरम्यान यातील अज्ञात आरोपीने घराचे दरवाजाचे लॉक तोंडुन घराचे आत प्रवेश करून कपाटाचे लॉक तोडुन त्यामध्ये ठेवलेले नगदी १५,५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सतिश फुटाणे मो. नं. ९५५२५५६८२४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**